# जाहिरात (संकेतस्थळावर देण्यासाठी)

## डॉ. पंजाबराव देशमुख वस्तीगृहात निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी देणे बाबत

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथील दोन वसतिगृहे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी नोंदणीकृत संस्थांना करारानुसार विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून चालवण्यासाठी देणेबाबत इच्छुक संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

सदर योजनेखाली वसतिगृह भाड्याने चालविण्याकरिता इच्छुक संस्थांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मा. जिल्हाधिकारी परभणी यांचे नावाने (https:/www.mahatenders.gov.in) या संकेत स्थळावर दिनांक २४/०२/२०२१ रोजी दुपारी ०३.०० वाजेपासून ते दिनांक २५/०३/२०२१ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारले जातील. अर्ज करणारी संस्था मुंबई विश्वस्त कायदा १९५० किंवा संस्था नोंदणी कायदा १८६० अंतर्गत नोंदणीकृत असावी. तसेच संस्थेचे किमान मागील सलग ३ वर्षाचे लेखा परिक्षण झालेले असावे. शा.नि.क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२४९/१८/तांशि-४ दि.१३ जुलै २०१८ मध्ये अटी व शर्ती नमूद केलेल्या आहे.

**शा.नि.क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२४९/१८/तांशि-४ दि.१३ जुलै २०१८ मधील अटी व शर्ती खालीलप्रमाणे:**

१) सदर योजनेखाली वसतिगृह भाड्याने चालविण्याकरिता इच्छुक संस्थांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मा. जिल्हाधिकारी परभणी यांच्या संकेतस्थळावर (https:/www.mahatenders.gov.in) स्वीकारले जातील.

२) अर्ज करणारी संस्था मुंबई विश्वस्त कायदा १९५० किंवा संस्था नोंदणी कायदा १८६० अंतर्गत नोंदणीकृत असावी.

३) सदरील संस्थेचे किमान मागील सलग ३ वर्षाचे लेखा परिक्षण झालेले असावे.

४) सदरील संस्थेने मागील किमान सलग ३ वर्षाचे आय टी. रिटर्न भरलेले असावे.

५) जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

६) एकापेक्षा अनेक संस्थांची मागणी आल्यास अनुभवी व जास्त क्षमता असणाऱ्या संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

७) अर्जांची छाननी करून गुणवत्तेनुसार संस्थेची निवड करण्याचे अधिकार मा.जिल्हाधिकारी यांना राहतील.

स्वाक्षरीत/-
सदस्य सचिव तथा प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन जिंतूर

स्वाक्षरीत/-
मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी
परभणी

शासकीय तंत्रनिकेतन ★ जिंतूर जि.परभणी ★

संजय राजपूत

**Principal**
**Govt.Polytechinic,Jintur**